MHRG070000152026

## फौजदारी चौकशी अर्ज क्र.०२/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश

सदर अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम ५०३ अन्वये अर्जदार शाहरुख सलीम शेख, राहणार –फ्लॅट नं.३०१५, अंबर हेरिटेज, मातोश्री नगर, नेरळ–४१०१०१ ता. कर्जत, जि. रायगड यांनी सायबर क्राईम पोर्टल तक्रार क्र.३१९१२२५०२४१०४६ मधील रक्कम रु.२१,०००/– (अक्षरी रक्कम एकवीस हजार रुपये मात्र) दिनांक १४/१२/२०२५ रोजी अर्जदार यांच्या येस बॅक, बदलापूर शाखेतील खाते क्र. ०२२५५२००००१५३४९ तसेच आय.सी.आय सी.आय बॅंक, अंधेरी शाखेतील खाते क्र.६४३८०१५२०२३३, तसेच स्टेट बॅक ऑफ इंडिया, शिवाजी तलाव, भांडूप पश्चिम, शाखेचा खाते क्र.३८८६५१५७५५९ या अर्जदाराच्या खात्यातून अनोळखी आरोपीच्या खात्यावर सदर रक्कम वळती झालेली आहे. सदरची वळती रक्कम ही परत मिळविण्यासाठी अर्जदार यांनी अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार यांनी दिनांक १४/१२/२०२५ रोजी ओ एल एक्सवर एक गाडी घेण्यासाठी मालकाला कॉल केला तेव्हा त्यांनी अर्जदार यांना सांगितले की, २,०००/– अ ॅडव्हास पाठवावे लागेल म्हणून अर्जदार यांनी अ ॅडव्हास पाठवला व त्यानंतर २ दिवसांनी अर्जदार यांना परत कॉल आला की, गाडीचे पेपर बनवायचे आहेत तर पूर्ण पेंमेट करुन टाका. अर्जदार यांनी समोरील इसमाचे

सांगण्यावरून पूर्ण पेमेंट करुन टाकले परंतु समोरील इसम अर्जदार यांना गाडी देण्यासाठी टाळाटाळ करत होते तेव्हा अर्जदार यांच्या लक्षात आले की, त्यांची आर्थिक फसवणुक झालेली आहे. त्यानंतर अर्जदाराने नेरळ पोलीस स्टेशन येथे दिनांक १४/१२/२०२५ रोजी ऑनलाईन सायबर तक्रार दाखल केलेली होती. अर्जदाराने दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासी अमंलदारामार्फत तपास करताना अनोळखी आरोपीच्या वेगवेगळ्या बॅकांची खाते गोठवण्यात आलेले आहे. सदरच्या खात्यात अर्जदाराची फसवणूक करुन गेलेल्या रक्कमेपैकी काही रक्कम जमा असल्याची माहिती तपासी अमंलदारमार्फत अर्जदारास देण्यात आलेली आहे. सदरची गोठवण्यात आलेली रक्कम अर्जदारास परत मिळावी,यासाठी मा.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. सदरची गोठविण्यात आलेली रक्कम ही अर्जदाराच्या खात्यावर वळती केल्यास अर्जदारांचे उर्वरीत पैशांचे नुकसान होणार नाही. अर्जदारास रक्कम परत मिळल्यास योग्य त्या अटी व शर्तीच्या बॉंड लिहून देण्यात तयार आहे. इतर योग्य ते न्यायाचे आदेश अर्जदार यांच्या लाभात व्हावेत,तरी सदरची गोठविण्यात आलेली रक्कम ही परत मिळविण्यासाठी सदरचा अर्ज अर्जदाराने मे. न्यायालयात केलेला आहे.

०३. सहा. सरकारी अभियोक्ता आणि सहा पोलीस निरीक्षक, नेरळ पोलीस स्टेशन यांचे म्हणणे मागविले. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे कथन केले आहे की, सदर गुन्हांचे तपासकामी फिर्यादी यांची अपहारीत रक्कम गोठविण्यात आलेली आहे. सदर रक्कम ही फिर्यादीचे मालकीची असलेबाबतचा पुरावा दाखल केला आहे. सदर रक्कम हा महत्वाचा पुरावा आहे. ती परत केल्यास फिर्यादी खर्च करण्याची शक्यता असून गुन्हा शाबीतीसाठी अडथळा निर्माण होईल. सबब, अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, ही. मे. कोर्टास नम्र विनंती आहे. सहा .पोलीस निरीक्षक,

नेरळ पोलीस स्टेशन यांचे असे कथन केले आहे की, वरील अर्जदार यांनी दिलेल्या ऑनलाईन तक्रारीमध्ये फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी १४,०००/- रुपये रक्कम गोठविण्यात आलेली आहे. सदरची रक्कम ही खालीलप्रमाणे खात्यात जमा झालेली असून गोठविण्यता आलेली आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया खाते क्र.७४६८१०११०००७४२० सदरील खात्यात रक्कम रुपये १४,०००/- गोठविण्यात आलेले आहेत. अशा प्रकारे एकूण रक्कम रुपये १४,०००/- आहे. अर्जदार यांच्या फसवणुक झालेल्या रकमेपैकी नमूद रक्कम योग्य अटी व शर्तीवर परत देणेस आमची काही एक हरकत नाही.

०४. सहा. सरकारी अभियोक्ता व सहा पोलीस निरीक्षक, नेरळ पोलीस स्टेशन यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले. ऑनलाईन सायबर तक्रारीची प्रत, बँक स्टेटमेंटच्या प्रति, अर्जदाराच्या आधारकार्डची प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

०५. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. पोलीस उपनिरीक्षक, नेरळ पोलीस स्टेशन यांनी म्हणणे दाखल करुन सदरचे पैसे योग्य त्या अटी शर्तीवर परत देण्यास हरकत नसल्याचे नमुद केले आहे. सबब, सदरची रक्कम अर्जदारास परत देणे मला उचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | सायबर क्राईम पोर्टल तक्रार तक्रार क्र. क्र. ३१९१२२५०२४१०४६ मधील वळती झालेली एकुण रक्कम मधील रु.१४,०००/- (अक्षरी |

| | |
|---|---|
| | रक्कम चौदा हजार रुपये मात्र) ही रक्कम अर्जदार शाहरुख सलीम शेख, यांना रक्कम रुपये रु.१४,०००/- (अक्षरी रक्कम चौदा हजार रुपये मात्र) रुपयांच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अंतरिम स्वरुपात द्यावी. सदरची रक्कम अर्जदार यांच्या वर नमुद बँक खात्यात वर्ग करण्यात यावी. |
| ३. | जप्त रक्कम ही अर्जदाराची नसल्याचे निष्पन्न झाल्यास अर्जदार यांनी सदरची रक्कम परत करावी. |
| ४. | अर्जदाराने सदर रक्कम ही निर्देशित तारखेस न्यायालयात हजर ठेवावी. |
| ५. | सदर आदेशाची प्रत नेरळ पोलीस स्टेशन व सायबर क्राईम विभाग यांच्याकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी. |

Sd/-

कर्जत.
दिनांक : ०२/०३/२०२६

(श्रीमती ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.
जि. रायगड